आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ सप्टेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधल्या संविधान मंदिराचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते लोकार्पण / राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा, तर संसद राज्यघटनेची रक्षक असल्याचं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दाखवला ६ वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा, सबका साथ सबका विश्वास या मंत्रानं देशात विचारधारा आणि प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल केल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- महाविकास आघाडीचं सरकार सत्तेवर आल्यानंतर जुनी पेन्शन योजना लागू करण्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचं आश्वासन
- देशातल्या प्रसारणाचा महत्त्वपूर्ण भाग असलेल्या दूरदर्शनची ६५ वी वर्षपूर्ती

**आणि**

- धुळे जिल्ह्यात प्रवासी वाहन आणि व्हॅनच्या अपघातात पाच जणांचा मृत्यू, चार जण जखमी

**<><><><><>**

राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा, तर संसद ही राज्यघटनेची रक्षक असल्याचं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. ते आज राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिराचं लोकार्पण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातल्या कार्यक्रमात दूरदृश्य पद्धतीनं केल्यानंतर बोलत होते. भारतीय राज्यघटना सर्वार्थानं वैशिष्ट्यपूर्ण असून राज्यघटनेचा गाभा आपण समजून घेणं गरजेचं आहे. राज्यघटना हा मिरवण्याचा नव्हे तर वाचून, समजून घेण्याचा ग्रंथ आहे, असं ते म्हणाले….

## होल्ड--बाईट--उपराष्ट्रपती

राज्यघटनेनं दिलेल्या आरक्षणाला काही लोक विरोध करत आहेत, मात्र आरक्षण हा भारताचा, राज्यघटनेचा आत्मा आहे. सामाजिक न्याय हा आरक्षणाचा आधार असून वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देणं गरजेचं आहे, असं त्यांनी सांगितलं.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे स्वयंउद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा आणि इतर यावेळी उपस्थित होते. भारत ही जगातली सर्वात जास्त विविधतेनं नटलेली लोकशाही आहे, आणि ही विविधताच आपल्या लोकशाहीला बळ देते, असं राज्यपाल राधाकृष्णन यावेळी म्हणाले.

यावेळी 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि त्यांच्या पत्नी सुदेश धनखड यांनी वृक्षारोपण केलं.

**<><><><><>**

नागपुरातल्या रामदेव बाबा विद्यापीठात आज डिजिटल टॉवरचं  उद्घाटनही धनखड यांनी केलं. विद्यार्थ्यांनी केवळ सरकारी नोकऱ्यांमध्ये नव्हे, तर तंत्रज्ञानातल्या संधींचा शोध घेण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. या १२ मजली डिजिटल टॉवरमध्ये संगणक, विज्ञान, आणि अभियांत्रिकीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या डिजिटल वर्गांचा सामावेश आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, ब्लाॅकचेन यांसारखं अत्याधुनिक तंत्रज्ञान आव्हानात्मक, मात्र संधी उपलब्ध करून देणारं असल्याचं उपराष्ट्रपतींनी सांगितलं. विद्यार्थ्यांनी ही आव्हानं संधींमध्ये बदलावीत असं ते म्हणाले.

भारताला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी मानव संसाधनाची गरज आहे आणि अशी मानव संसाधनं ही विद्यापीठं तयार करत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

सबका साथ सबका विश्वास या मंत्रानं देशात विचारधारा आणि प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल केला असून गरीब, आदिवासी, दलित, वंचित, मागासवर्गीय, महिला, युवावर्ग आणि शेतकऱ्यांना प्राधान्य दिलं जात आहे, असं प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आपल्या झारखंड दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात आज ६ वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला, त्यावेळी ते बोलत होते. या कार्य्रक्रमात प्रधानमंत्र्यांनी ६६० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी आणि राष्ट्रार्पणही केलं.

केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांअंतर्गत बांधलेल्या  देशभरातल्या दोन कोटी नवीन घरांच्या वाटपाचा शुभारंभ आणि ४६ हजार लाभार्थ्यांच्या गृहप्रवेश सोहळा देखील या कार्यक्रमात पार पडला. या योजनेच्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात एकूण ३२ हजार कोटी रुपयांचा थेट मदतीचा पहिला हप्ता जमा करण्यात आला. प्रधान मंत्री आवास योजना- ग्रामीणच्या २० हजार लाभार्थ्यांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आवास मंजुरी पत्रांचं वाटपही करण्यात आलं.

<><><><><>

महाविकास आघाडीचं सरकार सत्तेवर आल्यानंतर मंत्रीमंडळाच्या पहिल्याच बैठकीत जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलं आहे. शिर्डी इथं पेन्शन राज्य महाअधिवेशनात बोलत होते.

या अधिवेशनाला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आणि इतर नेते उपस्थित होते. पटोले यांनीही त्यांच्या भाषणात हे आश्वासन दिलं. जुनी पेन्शन योजना काँग्रेसच्या काळात सुरु होती, ती अटल बिहारी वाजपेयी सरकारनं बंद केली. आणि आता भाजपा काँग्रेसवर आरोप करत आहे. पण काँग्रेसचं सरकार ज्या राज्यात आहे तिथं जुनी पेन्शन योजना लागू केली आहे, असं ते म्हणाले.

राज्यात अडीच लाख सरकारी पदं रिक्त आहेत पण महायुती सरकार ती पदं भरत नाही. मविआचं सरकार आल्यानंतर ही रिक्त पदंही भरली जातील, असं पटोले यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्रातलं सरकार आणि राज्यातलं महायुतीचं सरकार हे शेतकरी विरोधी सरकार आहे, अशी टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज धुळे जिल्ह्याल्या शिंदखेडा इथं आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. सरकारला  शेतकऱ्यांबद्दल आस्था नाही त्याचप्रमाणं राज्यात महिला सुरक्षित नाहीत, त्यामुळे विधानसभा निवडणुकीत हे सरकार हटवून आपल्या विचारांचं सरकार आणणं ही जनतेची जबाबदारी आहे, असंही ते म्हणाले.

<><><><><>

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, ओमानमधल्या गणेशोत्सवाविषयी…..

<><><><><>

देशातील प्रसारणाचा महत्त्वपूर्ण भाग असलेलं दूरदर्शन आज आपली ६५ गौरवशाली वर्षे पूर्ण करत आहे. १५ सप्टेंबर १९५९ रोजी स्थापन झालेल्या दूरदर्शनने भारताच्या प्रसारण युगाची सुरुवात केली. तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी त्या दिवशी दूरदर्शनच्या पहिल्या प्रसारणाचं उद्घाटन केलं होतं. १९७५ पर्यंत दूरदर्शन आकाशवाणीचाच घटक होता. १ एप्रिल १९७६ रोजी, त्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या एका स्वतंत्र विभागात रूपांतर झालं. सरकारचं स्वायत्त सार्वजनिक सेवा प्रसारक असलेलं दूरदर्शन प्रसार भारतीच्या दोन विभागांपैकी एक आहे. आज, दूरदर्शन आपल्या स्टुडिओ आणि ट्रान्समीटरच्या विशाल जाळ्यासह देशातली सर्वात मोठी प्रसारण संस्था आहे. दूरचित्रवाणी, ऑनलाइन आणि मोबाइल सेवेबरोबरच दूरदर्शन – महानगर, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये, ३५ उपग्रह वाहिनी चालवणाऱ्या नेटवर्कमध्ये दूरदर्शनचा विस्तार झाला असून यात २४ तास चालणार्या ६ राष्ट्रीय वाहिन्या आणि २२ प्रादेशिक वाहिन्या आहेत. याबरोबरच ५९ ट्रान्समीटरसह डीडी, सहा प्रादेशिक आणि एक आंतरराष्ट्रीय वाहिनी चालवत असते. या व्यतिरिक्त दूरदर्शनच्या दिल्लीतल्या तोडापूर अर्थ स्टेशनवरून डीडी फ्री डिश - ही DD DTH सेवा उपलब्ध आहे. कृष्णधवल दूरचित्रवाणीच्या काळापासून ते डिजिटल आणि सॅटेलाइट प्रसारणाच्या सध्याच्या युगापर्यंत, दूरदर्शननं आपल्या विविध स्तरांमधल्या प्रेक्षकांची बदलती अभिरुची आणि प्राधान्यक्रम पूर्ण करण्यासाठी स्वतःचा सातत्त्यानं विकास केला आहे.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यातल्या शिंदखेडा तालुक्यात आज प्रवासी वाहन आणि व्हॅन यांची धडक होऊन झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी

झाले. मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. सर्व प्रवासी शिंदखेडा तालुक्याचे रहिवासी आहेत. जखमींना धुळे इथल्या भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><>

अभियंता दिनानिमित्त आज नागपूरमध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते राज्यस्तरीय उत्कृष्ट अभियंता पुरस्कार प्रदान करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागानं आयोजित केलेल्या या कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणारे अभियंते, वास्तुशास्त्रज्ञ , अतांत्रिक संवर्गातील कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला, तसंच उत्कृष्ट प्रकल्प पुरस्कार देखील वितरीत करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागात देश उभारणीची मोठी ताकद असल्याचे गौरवोद्गार रविंद्र चव्हाण यांनी यावेळी काढले.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.